**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १३/२०१३ मध्ये निशाण २५१ वरील आदेश.</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ५५ यांनी कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. ५५ यांनी अर्जामध्ये कथन केलेल आहे की,सदर कामी आवश्यक ती कागदपत्रे जुनी असल्याने ती मुदतीत मिळू शकली नाहीत. तसेच त्यानंतर कोविड–१९ लॉकडाऊनच्या कालावधीमूळे व प्रतिवादी क्र. ५५ हे आजारी असल्यामूळे वेळेत वकीलांची भेट घेता आली नाही. तसेच त्यानंतर न्यायाधीशाची नियुक्ती झालेली नसल्यामुळे प्रतिवादी क्र. ५५ यांस त्यांची कैफियत मुदतीत दाखल करता आलेली नाही. त्यामुळे आज रोजी कैफियत दाव्याचे कामी दाखल करून घेणेत यावी अशी विनंती केली.

३. सदरहू अर्जावर वादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. वादी यांनी सदर अर्जावर पुढीलप्रमाणे म्हणणे दिले की, प्रस्तुत कामी दिलेले म्हणणे संयुक्तीक नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूच्या सुविज्ञ वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. सदरचा दावा हा पृथक कब्जा व निरंतर ताकीदीसाठी केलेला आहे. दाव्यात प्रतिवादी क्र. ५५ यांनी मुदतीत कैफियत दाखल न केलेमुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरूप पाहता प्रतिवादी क्र. ५५ यांची कैफियत अभिलेखावर घेणे व त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल.

६. दाव्याचा निकाल गुणदोषावरती लागणेसाठी दाव्यामध्ये प्रतिवादी यांना आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. सबब न्यायाचे दृष्टीकोनातून दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम १५१ अन्वये व नैसर्गिक न्याय तत्वांचा विचार करता, प्रतिवादी क्र. ५५ यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल करुन दावा गुणदोषांवर चालण्यास विलंब केलेला आहे. सदरचे कृत्य हे खर्चास पात्र आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे:–

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र. ५५ यांचा अर्ज निशाण २५१ रक्कम रूपये ५००/– इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ५५ यांना दाव्याचे कामी कैफियत दाखल करणेची परवानगी देणेत येत आहे.

३. उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

PRATHAMESH RAMESH BHOSALE
Digitally signed by PRATHAMESH RAMESH BHOSALE
Date: 2023.10.18 18:15:27 +0530

**दिनांक १७/१०/२०२३** **(प्र.र.भोसले)**

**ठिकाण लांजा** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**लांजा,जि.रत्नागिरी**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| Judgment/Order in :- **Order on Exh. 251** in **R.C.S. 13/2013** | | |
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 17/10/2023 |
| Order Signed by P.O. on | :- | 17/10/2023 |
| Order uploaded on | :- | 18/10/2023 |